# पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

**परीक्षा सुधारित परिपत्रक क्रमांक : १५३**

## विषय- खेळाडू विद्यार्थ्यांची विशेष परीक्षा.

परीक्षा परिपत्रक क्रमांक २००/२००१ (संदर्भ क्रमांक परीक्षा-समन्वय/२१९८), दिनांक २७ जुलै, २००१ मधील तरतुदीनुसार ज्या विद्यार्थी खेळाडूंची राष्ट्रीय पातळीवरील, अशियाई वा ऑलिंपिक क्रिडा स्पर्धांसाठी निवड झाली आहे. अशा विद्यार्थ्यांची तसेच खालील दर्शविल्याप्रमाणे विशेष परीक्षा घेण्यात येते.

१. राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय छात्रसेना, राष्ट्रीय सेवायोजना, वादविवाद स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, नाटय, मूट कोर्टस व मा. व्यवस्थापन परिषदेने वेळोवेळी मान्य केलेल्या स्पर्धा,

२. राष्ट्रीय शारीरिक कार्यक्षमता व पुणे विद्यापीठाचे प्रौढ शिक्षण कार्यक्रम या स्पर्धामध्ये सहभागी होणा-या विद्यार्थ्यांचा विद्यापीठ परीक्षांचा कार्यक्रम तो भाग घेत असलेल्या स्पर्धांच्या कार्यक्रमाच्या बरोबरीने येत असेल तर अशा खेळाडू विद्यार्थ्यांची विशेष परीक्षा (Special Examination) विद्यापीठ आयोजित करते.(सोबत परिपत्रकाची प्रत).

३. तसेच शैक्षणिक वर्ष २००४-२००५ पासून परीक्षा परिपत्रक क्रमांक ४५६/२००४ (संदर्भ क्रमांक परीक्षा-समन्वय/१४०९) दिनांक २९.११.२००४ मधील तरतुदीनुसार आंतर महाविद्यालयीन/ आंतर विभागीय क्रिडा स्पर्धेमध्ये भाग घेणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांच्या सत्रांत परीक्षांचा कार्यक्रम ते भाग घेत असलेल्या स्पर्धाच्या कार्यक्रमाच्या बरोबरीने येत असल्यास संबंधित विद्यार्थ्यांची विशेष सत्रांत परीक्षा संबंधित महाविद्यालय आयोजित करते.

४. पुणे विद्यापीठातील कार्यक्षेत्रातील वरीष्ठ महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थामधील खेळाडू तसेच आंतरविभागीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेले खेळाडू.(परीक्षा मंडळ ठराव क्रं. ३०/२०१३ (१६.०७.२०१३)

५. आंतर महाविद्यालयीन/ आंतर विभागीय क्रिडा स्पर्धेमध्ये भाग घेणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांच्या सत्रांत परीक्षांचा कार्यक्रम ते भाग घेत असलेल्या स्पर्धाच्या कार्यक्रमाच्या बरोबरीने येत असल्यास संबंधित विद्यार्थ्यांची विशेष सत्रांत परीक्षा संबंधित महाविद्यालय आयोजित करते. सोबत परिपत्रकाची छायांकीत प्रत माहिती व संदर्भासाठी जोडली आहे.

६. विद्यापीठाचा अभ्यासक्रम बदलल्यामुळे, काही विद्यार्थ्यांची एकाच दिवशी, एकाच वेळेस दोन विषयांची परीक्षा येत असल्यास सदर विद्यार्थ्यांचीसुध्दा वरील विद्यार्थ्यांच्या विशेष परीक्षेबरोबर अशी परीक्षा आयोजित करण्यात येते.

विशेष परीक्षेचे अर्ज महाविद्यालय/मान्यताप्राप्त संस्था यांनी सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यातील अर्जानुसार मा. प्राचार्य/संचालकांमार्फत सदर परीक्षा संपल्यानंतर १० दिवसाच्या आत या कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे. अशाप्रकारे विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जानुसार सदर विद्यार्थ्यांची विशेष परीक्षा (Special Examination) वेळेत आयोजित करण्यात येईल.

मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये /मा. संचालक, मान्यताप्राप्त संस्था यांना या परिपत्रकाद्वारे विनंती करण्यात येते की, या परिपत्रकाचा आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावा आणि योग्य ती पुढील कार्यवाही करावी.

सोबत : वरीलप्रमाणे

गणेशखिंड, पुणे-७.

परीक्षा नियंत्रक

संदर्भ क्रमांक परीक्षा-समन्वय/९९२
दिनांक: २८.१०, २०१३
प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी-:

१. मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये /मा. संचालक, मान्यताप्राप्त संस्था
२. मा. संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
३. मा. संचालक, विद्यापीठ क्रीडा मंडळ
४. मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सहायक
५. उपकुलसचिव (१,२,३ व ४)
६. सहायक कुलसचिव, (शैक्षणिक)
७. परीक्षा विभागातील सर्व सहायक कुलसचिव
८. परीक्षा विभागातील सर्व कक्षाधिकारी
९. केंद्र प्रमुख, विद्यापीठ उपकेंद्र, अहमदनगर व नाशिक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. ३९/२०२२

**विषय— ऑक्टोबर २०२२ सत्राच्या विशेष परीक्षांचे आयोजन करणेबाबत...**

मा. विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार ऑक्टोबर २०२२ (आयोजन जानेवारी २०२३) परीक्षेच्या कालावधीमध्ये जे विद्यार्थी विद्यापीठीय, राज्य, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय पातळीवरील सांस्कृतिक, क्रीडास्पर्धा, मा. कुलपती यांनी वेळोवेळी निर्देशित केलेल्या स्पर्धा तसेच मा. व्यवस्थापन परिषदेने वेळोवेळी मान्य केलेल्या स्पर्धामध्ये व इतर कार्यक्रमामध्ये, सहभागी होणारे/झालेले असतील तसेच राष्ट्रीय सेवायोजना व राष्ट्रीय छात्रसेना योजना यामध्ये सहभागी होणारे/झालेले असतील अशा पात्र विद्यार्थ्यांची विशेष परीक्षा आयोजनाची पर्यायी व्यवस्था करण्यात येत आहे. समकक्ष विषय व इतर कारणांमुळे विद्यापीठ परीक्षा एकाच दिवशी येत असेल तसेच एकाच वेळेस दोन विषयांची परीक्षा येत असल्यास आणि केंद्रिय प्रवेश प्रक्रिया (CET) राष्ट्रीय पात्रता चाचणी (NET), राज्यस्तरीय पात्रता चाचणी (SET), C.A., CMA, UPSC, MPSC इत्यादी तत्सम परीक्षा व विद्यापीठ परीक्षा एकाच दिवशी येत असल्यास अशा पात्र विद्यार्थ्यांची विशेष परीक्षा आयोजनाची पर्यायी व्यवस्था करण्यात येत आहे.

उपरोक्त नमूद पात्र असणाऱ्या व परीक्षा अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा आयोजनाबाबत पर्यायी व्यवस्था म्हणून विशेष परीक्षांचे आयोजन करण्यात येईल. त्या करीता विद्यार्थ्यांनी आपले अर्ज संबंधित महाविद्यालयात सर्व कागदपत्रांसह जमा करावे व मा. प्राचार्य/संचालक यांनी सदर अभ्यासक्रमाची परीक्षा संपल्यानंतर प्राधान्यक्रमाने दहा दिवसांच्या आत न चुकता सर्व कागदपत्रांसह संबंधित विद्यार्थ्यांचे विशेष परीक्षा आयोजनाचे प्रस्ताव परीक्षा विभागास दिलेल्या विहित मुदतीत सादर करावेत. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जानुसार केवळ पात्र विद्यार्थ्यांची विशेष परीक्षा आयोजित करण्यात येईल व त्याबद्दल वेळोवेळी अवगत करण्यात येईल.

मा. प्राचार्य/संचालक/महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, वरील सूचनांचे अवलोकन करून याबाबत आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी यांना आपल्या स्तरावरून सूचित करावे व त्यांच्या शंकांचे निरसन करून विद्यापीठास सहकार्य करावे.

(सही) 09/01/2023.
संचालक करिता
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ :— परीक्षा—समन्वय/७४
दिनांक:— ०९ जानेवारी, २०२३

प्रति,
मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. १०४/२०२२

मा. विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार परीक्षेच्या कालावधीमध्ये जे विद्यार्थी आंतरविद्यापीठीय, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय पातळीवरील सांस्कृतिक व क्रीडास्पर्धा अथवा इतर कार्यक्रमामध्ये सहभागी होणारे/झालेले असतील तसेच राष्ट्रीय सेवायोजना व राष्ट्रीय छात्रसेना योजना यामध्ये सहभागी होणारे/झालेले असतील अशा खालील पात्र विद्यार्थ्यांची परीक्षा आयोजनाची पर्यायी व्यवस्था करण्यात येत आहे.

१ ज्या विद्यार्थी खेळाडूंची राष्ट्रीय पातळीवरील आशियाई किंवा ऑलिपिंक स्पर्धासाठी निवड झालेली आहे.

२ राज्यस्तरीय राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर तसेच राष्ट्रीय छात्रसेना, राष्ट्रीय सेवा योजना, वादविवाद स्पर्धा व मा. व्यवस्थापन परिषदेने वेळोवेळी मान्य केलेल्या स्पर्धामध्ये सहभागी होणारे/झालेले विद्यार्थी.

३. राष्ट्रीय शारीरीक कार्यक्षमता व विद्यापीठाचे प्रौढ शिक्षण कार्यक्रम या स्पर्धामध्ये सहभागी होणारे/झालेले विद्यार्थी.

४. मा. कुलपती यांनी वेळोवेळी निर्देशित केलेल्या स्पर्धा (उदा. इंद्रधनुष्य, अश्वमेघ, आविष्कार इ.) तसेच अखिल भारतीय विश्व विद्यालय संघ, नवी दिल्ली व केंद्र शासन व राज्य शासन यांनी आयोजित केलेल्या सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धामध्ये सहभागी होणारे/झालेले विद्यार्थी.

५. तसेच समकक्ष विषय व इतर कारणांमुळे एकाच दिवशी, एकाच वेळेस दोन विषयांची परीक्षा येत असल्यास.

६. केंद्रिय प्रवेश प्रक्रिया (CET) राष्ट्रीय पात्रता चाचणी (NET), राज्यस्तरीय पात्रता चाचणी (SET), C.A., CMA, UPSC, MPSC इत्यादी तत्सम परीक्षा व विद्यापीठ परीक्षा एकाच दिवशी येत असल्यास.

उपरोक्त नमूद पात्र असणाऱ्या व परीक्षा अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा आयोजनाबाबत पर्यायी व्यवस्था म्हणून विशेष परीक्षांचे आयोजन करण्यात येईल. त्या करीता विद्यार्थ्यांनी आपले अर्ज संबंधित महाविद्यालयात सर्व कागदपत्रांसह जमा करावे व मा. प्राचार्य/संचालक यांनी सदर अभ्यासक्रमाची परीक्षा संपल्यानंतर प्राधान्यक्रमाने दहा दिवसांच्या आत न चुकता सर्व कागदपत्रांसह संबंधित विद्यार्थ्यांचे विशेष परीक्षा आयोजनाचे प्रस्ताव परीक्षा विभागास दिलेल्या विहित मुदतीत सादर करावेत. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जानुसार केवळ पात्र विद्यार्थ्यांची विशेष परीक्षा आयोजित करण्यात येईल व त्याबद्दल वेळोवेळी अवगत करण्यात येईल.

मा. प्राचार्य/संचालक/महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, वरील सूचनांचे अवलोकन करून याबाबत आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी यांना आपल्या स्तरावरून सूचित करावे व त्यांच्या शंकांचे निरसन करून विद्यापीठास सहकार्य करावे.

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ :— परीक्षा—समन्वय/३२६
दिनांक:— ०४ जुलै, २०२२

प्रति,
मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,

## विशेष परीक्षांसंबंधी

### परिपत्रक क्र. २००/२००१

सर्व संबंधितांना या परिपत्रकाद्वारे असे कळविण्यात येते की, ज्या खेळाडूंची राष्ट्रीय पातळीवरील किंवा आशियाई क्रीडा स्पर्धांसाठी अथवा ऑलिम्पिक स्पर्धेसाठी निवड होऊन त्या त्या पातळीवर जे खेळाडू खेळतात अशा विद्यार्थी खेळाडूंच्या परीक्षांचा कार्यक्रम हा सामन्याच्या कार्यक्रमाच्या बरोबरीने येत असेल तर अशा संबंधित विद्यार्थी खेळाडूंची वेगळी परीक्षा घेण्यात यावी असा यापूर्वी निर्णय घेण्यात आला आहे. परंतु राष्ट्रीय छात्रसेना, राष्ट्रीय सेवा योजना, वादविवाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, नाट्य, मूट कोर्ट्स व मा. व्यवस्थापन परिषदेने वेळोवेळी मान्य केलेल्या स्पर्धा, राष्ट्रीय शारीरिक कार्यक्षमता व पुणे विद्यापीठाचे प्रौढ शिक्षण कार्यक्रम या स्पर्धांमध्ये भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संबंधित निर्णयानुसार पूर्वी विशेष परीक्षा घेतली जात नसे. परंतु या बाबींवर संबंधित विद्यार्थ्यांना संबंधित अध्यादेशातील तरतुदीनुसार काही अधिकचे गुण देण्यात येतात.

या सर्व बाबींचा विद्यापीठ अधिकार मंडळाने सांगोपांग विचार करून असा निर्णय घेतला आहे की, राष्ट्रीय पातळीवरील, आशियाई क्रीडा स्पर्धांसाठी वा ऑलिम्पिक स्पर्धेसाठी निवड झालेल्या विद्यार्थी खेळाडूंच्या परीक्षेचा कार्यक्रम हा सामन्याच्या कार्यक्रमाच्या बरोबरीने येत असेल तर अशा खेळाडूंची वेगळी परीक्षा घेण्यात यावी व त्यानुसार **राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर** राष्ट्रीय छात्रसेना, राष्ट्रीय सेवा योजना, वादविवाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, नाट्य, मूट कोर्ट्स व मा. व्यवस्थापन परषिदेने वेळोवेळी मान्य केलेल्या स्पर्धा, राष्ट्रीय शारीरिक कार्यक्षमता व पुणे विद्यापीठाचे प्रौढ शिक्षण कार्यक्रम या स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांचे संबंधित कार्यक्रम परीक्षेच्या कार्यक्रमाबरोबर येत असेल तर अशा खेळाडूंचीही वेगळी परीक्षा घेण्यात यावी.

मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये व मा. संचालक, मान्यताप्राप्त संस्था आणि विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग, पुणे विद्यापीठ यांना या परिपत्रकाद्वारे अशी विनंती की, विद्यापीठ अधिकार मंडळाच्या वरील निर्णयानुसार पात्र विद्यार्थ्यांची प्रकरणे संबंधित कागदपत्रांसहित व आपल्या शिफारशीसहित विहित मुदतीपूर्वी विद्यापीठाकडे सादर करण्यात यावीत, की जेणेकरून संबंधित प्रकरणात योग्य ती पुढील कार्यवाही करणे विद्यापीठास शक्य होईल. पुढे अशीही विनंती करण्यात येत आहे की, या परिपत्रकाचा आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा.

गणेशखिंड, पुणे-४११००७
जा.क्र. परीक्षा समन्वय/२१९८
दिनांक : २७ जुलै २००१

मा. शा. फिरंगे
परीक्षा नियंत्रक.